# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 January 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०८ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- एचएमपीव्ही संसर्गाबाबत घाबरू नये; मात्र खबरदारी घेण्याचं राज्यशासनाकडून आवाहन.
- पुढील शंभर दिवसांत राबवण्यात येणाऱ्या कामांसाठी मुख्यमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांसाठी सात कलमी कृती कार्यक्रम.
- राज्यातल्या चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य.

आणि

- तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवाला सुरुवात.

****

एच एम पी व्ही संसर्गाबाबत घाबरण्याचं कारण नाही, मात्र खबरदारी घेण्याचं आवाहन राज्य शासनानं केलं आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसंच वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेल्या वर्षभरात देशात या आजाराचे काही रुग्ण आढळले होते, ते सर्व रुग्ण रुग्णालयात दाखल न होताच बरे झाल्याची माहिती आबिटकर यांनी दिली. ते म्हणाले...

***आय सी एम आरनं ज्या वेळेला भारतामध्ये फेब्रुवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ मध्ये संभाव्य एच एन पी व्ही च्या विषाणूची आठ हजार बावन नमुन्यांच्या चाचण्या केल्या होत्या. या सगळ्या चाचण्यांच्या मध्ये एकूण १७२ पॉझिटीव्ह अशा पद्धतीच्या चाचण्या निघाल्या आहेत. फेब्रुवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ मध्ये ही सर्व प्रकरणं सौम्य होती. आणि त्याप्रमाणे***

***या कुठल्याही पेशंटला ॲडमिट न करता सुद्धा यातला कुठलाही पेशंट न दगावता सुद्धा अत्यंत चांगल्या पद्धतीनं ते बरे झालेत.***

या आजाराबाबत अनावश्यक भीती बाळगू नये, असं सांगताना, माध्यमांनी यासंदर्भातली वस्तुस्थिती जनतेसमोर ठेवण्याचं आवाहनही आबिटकर यांनी केलं...

***हा आजार नवीन नाहीये. किंवा याच्यामुळे फार मोठा धोका होतोय अशातला भाग नाही. फक्त काळजी घेणं आणि सुरक्षित पद्धतीनं त्याच्यावरती उपचार करणं आणि आपण सगळ्यांनी सुद्धा, माझी मिडीयाला सुद्धा विनंती आहे की, आपण सगळ्यांनी याबाबतची वस्तुस्थिती लोकांना सांगू या. केंद्र शासानाचे जे निर्देश येतील ते निर्देश आणि आपल्या आरोग्य विभागाची आणि वैद्यकीय शिक्षण विभागाची टीम अत्यंत चांगल्या पद्धतीनं काम करतोय. खूप चांगली टीम आपल्याकडची तयार आहे. त्या सगळ्या टीमचा आपण उपयोग करू या. आणि या एकूण आजाराची जी काही अनावश्यक भीती आपण बाळगतोय ती अनावश्यक भीती न बाळगता जे पेशंटस् असतील त्यांना आपण राईटली ट्रीट करण्यासाठी आपण सगळे जण काम करू या.***

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी बोलतांना, राज्यात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असं स्पष्ट केलं. तरीही सर्व वैद्यकीय महाविद्यालयांनी औषधांसह ऑक्सिजन आणि आवश्यकता वाटल्यास विलगीकरण व्यवस्थेच्या तयारीत राहावं, आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द कराव्यात अशा सूचना मुश्रीफ यांनी दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय – घाटीमध्ये सर्व व्यवस्था उपलब्ध असून, कोविड व्यवस्थापनाचा अनुभव असल्यानं, कोणतीही भीती बाळगण्याची गरज नसल्याचं, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ शिवाजी सुक्रे यांनी म्हटलं आहे...

***सद्याच्या स्थितीमध्ये हा आजार जो आहे, इतका जास्त धोकादायक नाही. यासाठीची संपूर्ण व्यवस्था छत्रपती संभाजीनगर येथील***

***घाटीमध्ये उपलब्ध आहे. कुठल्याही प्रकारची भीती सध्याच्या स्थितीमध्ये नाहीये. आणि भविष्यामध्येही येणार नाही. आपण कोविडचा चांगल्या प्रकारे मुकाबला केला आहे. गरज भासली तर रूग्णालयात येऊ उपचार घ्यावेत. कुणी स्वत:च्या मनाने यासाठी औषध उपचार घेऊ नये.***

छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी काल आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा यांच्यासह आरोग्य विभागाची बैठक घेऊन, एचएमपीव्हीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आढावा घेत, आवश्यक सूचना केल्या.

****

हिंगोली जिल्हा शासकीय रुग्णालयात खबरदारी म्हणून २४ खाटांचा अतिदक्षता विभाग सज्ज करण्यात आला असून, उपजिल्हा रुग्णालय तसंच ग्रामीण रुग्णालयातूनही काही खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊ नये असं आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या सर्व अधिकाऱ्यांसाठी सात कलमी कृती कार्यक्रम काल जाहीर केला. प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करण्याच्या कामांबाबत त्यांनी सविस्तर सूचना केल्या. यासंदर्भात काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या चारचाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. येत्या एक एप्रिलपासून वाहनावर फास्ट टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला कोणत्याही माध्यमातून दुप्पट पथकर भरावा लागणार आहे. राज्यात एम एस आर डी सी चे ५० पथकर नाके तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे २३ पथकर नाके आहेत.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे कुटुंबीय, भाऊ धनंजय देशमुख यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आमदार सुरेश धस, नमिता मुंदडा यावेळी उपस्थित होते. या प्रकरणात कुणालाही सोडणार नाही, कठोर कारवाई होणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. देशमुख कुटुंबियांना शंका असेल अशा अधिकाऱ्यांना विशेष तपास पथकात घेणार नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, संतोष देशमुख हत्या आणि परभणी घटनेच्या निषेधार्थ लातूर जिल्ह्यात सकल मराठा समाज आणि सर्वपक्षीय विचार मंचच्या वतीने काल ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात आलं. यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक खोळंबली होती. या प्रकरणांतल्या संशयितांना अटक करून कडक शिक्षा करण्याची मागणी आंदोलकांनी यावेळी केली.

****

श्री तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवाला काल घटस्थापनेनं प्रारंभ झाला. याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे वार्ताहर...

***संबळाचा कडकडाटात, तुतारीचा निनादात आणि आई राजा उदोच्या गजरात श्री तुळजाभवानी मंदिरात विधिवत घटस्थापना झाली. १४ जानेवारी पर्यंत हा शाकंभरी नवरात्र महोत्सव सुरु राहणार आहे. या दरम्यान देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार असून ११ जानेवारीला या शाकंभरी नवरात्र महोत्सवातील महत्वाची मानली जाणारी जलकुंभ यात्रा काढली जाणार आहे. देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर,धाराशिव.***

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दरवर्षी दिले जाणारे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार काल जाहीर झाले. २०२२ या वर्षासाठी प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ या वर्षाचा पुरस्कार आसामी कवी निलमकुमार यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

नांदेड जिल्ह्यात सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना मदतीसाठी राज्य शासनाने ८१२ कोटी मंजुर केले आहेत. ही रक्कम

शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे वाटप करण्यात येणार आहे. उर्वरीत चार लाख शेतकर्यांची माहिती पुढच्या दोन दिवसात भरण्यात येणार असून, पिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी ई–केवायसी पूर्ण करुन घ्यावी, असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केलं आहे.

****

अंबाजोगाई इथल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात उद्या नऊ जानेवारीला प्राचार्य बी. के. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होणार आहे. या स्पर्धेत राज्यातल्या वरिष्ठ महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याचं आवाहन संयोजकांनी केलं आहे.

****

नांदेड इथं भरवण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोन्नती अभियानाच्या मिनी सरस विक्री प्रदर्शनाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या प्रदर्शनात हस्तनिर्मित वस्त्रे तसंच वस्तू, खाद्यपदार्थ, मसाले, आदी उत्पादनाची दालनं लावण्यात आली आहे. १० जानेवारीपर्यंत हे प्रदर्शन सर्व नागरिकांसाठी खुलं राहणार आहे.

****

रस्ते सुरक्षेबाबत मुलांनीच आपल्या पालकांना शिक्षण देण्याची आवश्यकता वाटत असल्याचं, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी म्हटलं आहे. काल रस्ता सुरक्षा अभियानाचं उद्घाटन करतांना ते बोलत होते. गेवराई इथं लालबहादूर शास्त्री चौकात या अभियानाची कालपासून सुरुवात करण्यात आली, यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली.

****

प्रधानमंत्री पिक विमा योजनेतंर्गत रब्बी हंगाम २०२४ साठी शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी येत्या १५ जानेवारी पर्यंत नोंदणी करता येणार आहे. शेतकऱ्यांनी लवकरात लवकर या नोंदणीसाठी अर्ज करावा, असं आवाहन लातूर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव यांनी केलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तेरणा धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्याच्या दुरुस्ती कामाची आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काल पाहणी केली. हे काम अंतिम

टप्प्यात आलं असून, त्यामुळे परिसरातल्या सात गावांमधलं दीड हजाराहून अधिक हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

****

हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय दिव्यांग शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं उद्घाटन काल अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेत जिल्ह्यातल्या २० दिव्यांग शाळेतल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

****

पूर्णा – जालना आणि जालना – नांदेड या गाड्यांच्या क्रमांकात तसंच जालना – नांदेड या गाडीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. हे सर्व बदल आजपासून लागू झाले. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन रेल्वे व्यवस्थापनानं केलं आहे.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात रोटेगाव आणि परसोडा स्थानकादरम्यान रेल्वे मार्गाची देखभाल – दुरुस्ती करण्यासाठी उद्यापासून १७ जानेवारीपर्यंत लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात धर्माबाद–मनमाड मराठवाडा एक्सप्रेस धर्माबाद ते नांदेड दरम्यान तर नगरसोल–नरसापूर एक्सप्रेस नगरसोल ते लासूर दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. याच काळात मुंबई – नांदेड तपोवन एक्सप्रेस दोन तास उशीरा धावणार आहे.

दरम्यान, नांदेड – अमृतसर सचखंड एक्सप्रेस आज तिची नियोजित वेळ सकाळी साडे नऊ ऐवजी दुपारी तीन वाजता नांदेडहून सुटणार असल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वेनं दिली आहे.

****